maraaThii aaratii san.graha

Collection of Marathi Aaratiis

December 27, 1997

Contents

१ श्री गणेशाय नमः

प्रारंभी विनती करू गणपती विद्यादयासागरा ।
अज्ञानत्व हरोनी बुद्धि मति दे आराध्य मोरेश्वरा ।
चिंता-क्लेश-दरिद्र-दुःख अवघे देशांतरा पाठवी ।
हेरंबा गणनायका गजमुखा भक्तां बहू तोषवीं ॥

२ श्री गणेश आरती

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदूराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळाची ॥
जय देव जय देव जय मंगल मूर्ती ।
दर्शनमात्रे मन कामनापुर्ती ॥ जय देव
रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।
चंदनाची ऊटी कुंकुम केशरा ।
हीरे जडित मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ॥ जय देव
लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुण्ड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे
सुरवरवंदना ॥ जय देव

The Arati is by Samartha Ramadas (reference: daasa raamaachaa)

३ श्री दत्त आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा ।
नेती नेती शब्द न ये अनुमाना ।
सुरवर मुनिजन योगे समाधी न ये ध्यान ॥
जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता ।
आरति ओवाळीता हरली भवचिन्ता ॥ जय देव
सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त ।
अभाग्यासी कैसी नकळे ही मात ।
पराही परतली कैसा हा हेत ।
जन्म मरणाचा पुरलासे अंत ॥ जय देव
दत्त येऊनीया उभा ठाकला ।
सद्भावे साष्टांगे प्रणिपात केला ।
(**variation:** साष्टांगे नमने प्रणिपात केला ।)
प्रसन्न होउनीया आशीर्वाद दिधला ।
जन्मा मरणाचा फेरा वाचविला ॥ जय देव
दत्त दत्त ऐसे लागले ध्यान ।
हरपले मन झले उन्मन ।
मी तू पणाची झाली बोळवण ।
एका जनार्दनी श्री दत्त ध्यान ॥ जय देव

The Arati is by Sant Ekanath (reference: ekaa. janaardan is his Guru)

४ विठ्ठल आरती

युगे अठ्ठावीस विटेवरी ऊभा ।
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ।
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा ।
चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ॥
जय देव जय देव जय पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा ।
पावे जिवलगा ॥ जय देव
तुळसी माळा गळा कर ठेवुनी कटी ।
कासे पितांबर कस्तुरी लल्लाटी ।
देव सुरवर नित्य येती भेटी ।
गरुड हनूमंत पुढे उभे राहती ॥ जय देव
धन्य वेणुनाद अनुक्षेत्रपाळा ।
सुवर्णाची कमळे वनमाळा गळा ।
राई रखुमाबाइ राणीया सकळा ।
ओवाळू आरत्या विठोबा सावळा ॥ जय देव
ओवाळू आरत्या कुरवंड्या येती ।
चंद्रभागेमध्ये सोडुनिया देती ।
दिंड्या पताका वैष्णव नाचती ।
पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ जय देव
आषाढी कार्तिकी भक्तजन येती ।
चंद्रभागेमध्ये स्नान जे करती ।
दर्शन हेळामात्रे तया होय मुक्ती ।
केशवासी नामदेव भावे ओवाळिती ॥ जय देव

The Arati is by Sant Namdev

५ विठ्ठल आरती २

येई हो विठ्ठले माझे माऊली ये ।
निढळावरी कर ठेवुनि वाट मी पाहे... ॥धृ ॥
आलिया गेलिया हाती धाडी निरोप ।
पंढरपूरी आहे माझा मायबाप... ॥१ ॥
पिवळा पीतांबर कैसा गगनी झळकला ।
गरुडांवरि बैसोनि माझा कैवारी आला... ॥२ ॥
विठोबाचे राज्य आम्हां नित्य दिपवाळी ।
विष्णुदास नामा जीवेभावे ओंवाळी ... ॥३ ॥

The Arati is by Sant Namdev(? reference: naamaa)

६ श्री शंकर आरती

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा ।
विषे कंठ काळा त्रिनेत्री ज्वाळा ।
लावण्य सुन्दर मस्तकी वाळा ।
तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा ॥ जय देव
जय देव जय देव जय श्री शंकरा ।
आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा ॥ जय देव
कर्पुरगौरा भोळा नयनी विशाळा ।
अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ।
विभुतीचे उधळण शितकंठ नीळा ।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥ जय देव
देवी दैत्य सागर मंथन पै केले ।
त्यामाजी अवचीत हलहल जे उठले ।
ते त्वा असुरपणे प्राशन केले ।
नीळकंठ नाम प्रसिद्ध झाले ॥ जय देव
व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ।
पंचानन मनमोहन मुनिजन सुखकारी ।
शतकोटीचे बीज वाचे उच्चारी ।
रघुकुळटीळक रामदासा अंतरी ॥ जय देव

The Arati is by Samartha Ramdas (reference: raamadaasaa)

---

७ हनुमान आरती

सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी
करि डळमळ भूमंडळ सिंधू जळ गगनी ।
कडाडिले ब्रह्मांड धाके त्रिभुवनी
सुरवर चर निशाचर त्या झाल्या पळनी ॥१॥
जय देव जय देव जय श्री हनुमंता
तुमचेनी प्रसादे नाभे कृतांता जय देव जय देव (धृ)
दुमदुमली पाताळे उठिला प्रतिशब्द
थरथरला धरणीधर मानीला खेद ।
कडाडिले पर्वत उड्डगण उच्छेद
रामी रामदासा शक्तिचा शोध ॥२॥ जय देव

The Arati is by Samartha Ramdas (reference: raamadaasaa).

---

८ आरती भुवनसुंदराची

आरती भुवनसुंदराची ।इंदिरावरा मुकुंदाची ॥धृ ॥
पद्मसम पादयुग्मरंगा ।ओंवाळणी होति भृंगा ।
नखमणि श्रवताहे गंगा ।जे कां त्रिविधतापभंगा ॥
(चाल) वर्तुळ गुल्फ भ्राजमाने ।किंकिणीक्वणित,
नाद घणघणित, बांकिवर झुणित, नेपुरें झनन
मंजिरीची ।झनन ध्वनी मंजिरीची ॥१॥ आरती भुवन
पीतपट हाटकतप्तवर्णी ।कांची नितंबसुस्थानीं ।
नाभिची अगाध हो करणी ।विश्वजनकाची जे जननी ॥
(चाल) त्रिवलीललित उदरशोभा ।
कुंबुगळां माळ विलम्बित, झळाळ कौस्तुभ,
सरळ बाहु श्रिवत्स तरल मणि मरळ कंकणाची ।
प्रीति बहु, जडित कंकणाची ॥२॥ आरती भुवन
इंदुसम आस्य कुंदरदना ।अधरारुणार्कबिंबवदना ।
पाहतां भ्रांति पडे मदना ।सजलमेयब्धि दैत्यदमना ॥
(चाल) झळकत महरकुंडलाभा ।
कुटिल कुंतलीं, मयुरपत्रावली वेष्टिली,
तिलक भालिं, केशरी झळाळित कृष्णकस्तुरीची ।
अक्षता काळि कस्तुरीची ॥३॥ आरती भुवन
कल्पद्रुमातळीं मूर्ती ।सौदामिनी कोटिदिप्ती ।
गोपीगोपवलयभंवती ।
त्रिविष्टप पुष्पवृष्टि करिती ॥
(चाल) मंजुळ मधुर मुरलिनदें ।
चकित गंधर्व, चकित अप्सरा, सुरागिरिवरा,
धरा कर्पुरारतीनें प्रेमयुक्त सची ।
आरती ओंवळित साची ॥४॥ आरती भुवन
वृंदावनिंचे विहरणि ।सखे गे कृष्णमायबहिणी ।
श्रमलों भवाब्धिचे फिरणीं ।
आतां मज ठाव देई चरणीं ॥
(चाल) अहा हे पूर्ण पुण्यश्लोका ।
नमितों चरण शरण, मी करुणा येऊं दे विशालपाणी,
कृष्ण नेणतें बाळ आपुलें,
राखि लाज याची ॥५॥ आरती भुवन

---

९ ज्ञानेश्वर आरती

आरती ज्ञानराजा महाकैवल्य तेजा
सेविती साधुसन्त मनू वेधला माझा ॥१॥ आरती
लोपले ज्ञान जगी, हित नेणती कोणी,
अवतार पांडुरंग, नाम ठेवीले ज्ञनी ॥२॥ आरती
कनकाचे ताट करी, उभ्या गोपिका नारी,
नारद तुम्बरहू, साम गायन करी ॥३॥ आरति
प्रकट गुह्य बोले, विश्व ब्रह्मची केले,
रामा जनार्दनी, पायी टकची ठेले ॥४॥ आरति

---

१० श्री गणपती आरती

शेंदुर लाल चढायो अच्छा गजमुखको ।
दोंदिल लाल बिराजे सुत गौरिहरको ।
हाथ लिये गुडलड्डु सांई सुरवरको ।
महिमा कहे न जाय लागत हूं पदको ॥१ ॥
जय जय जी गणराज विद्या सुखदाता ।
धन्य तुम्हार दर्शन मेरा मन रमता ॥धृ ॥
अष्टौ सिद्धी दासी संकटको बैरि ।
विघ्नविनाशन मंगल मूरत अधिकारी ।
कोटीसूरजप्रकाश ऐसी छबि तेरी ।
गंडस्थलमदमस्तक झूले शशिबिहारि ॥२ ॥
भावभगतसे कोई शरणागत आवे ।

संतत संपत सबही भरपूर पावे ।
ऐसे तुम महाराज मोको अति भावे ।
गोसावीनंदन निशिदिन गुन गावे ॥ ३ ॥
The Arati is by gosAvIna.ndana

११ दुर्गा आरती

दुर्गे दुर्घटभारी तुजवीण संसारी ।
अनाथ नाथे अम्बे करुणाविस्तारी ।
वारी वारी जन्म मरणांते वारी ।
हारी पडलो आता संकट नेवारी ॥१॥
जय देवी जय देवी महिषासुरमथिनि ।
सुरवर ईश्वर वरदे तारकसंजीवनी ॥धृ॥
तुजवीण भुवनी पाहता तुज ऐसे नाही ।
चारी श्रमले परंतु न बोलवे काही ।
साही विवाद करिता पडले प्रवाही ।
ते तू भक्तालागी पावसि लवलाही ॥२॥
प्रसन्न वदने प्रसन्न होसी निजदासा ।
क्लेशांपासुनी सोडवी तोडी भवपाशा ।
अम्बे तुजवाचून कोण पुरवील आशा ।
नरहरी तल्लीन झाला पदपंकजलेशा ॥३॥
The Arati is by naraharii sonaar

१२ आरती

घालीन लोटांगण वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहिन रूप तुझे ।
प्रेमें आलिंगीन आनंद पूजन ।
भावे ओवाळिन म्हणे नामा ॥
त्वमेव माता पिता त्वमेव ।
त्वमेव बन्धुः सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वं मम देवदेव ॥
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा ।
बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।
करोमि यद्यत् सकलं परस्मै ।
नारायणायेती समर्पयामि ॥
अच्युतं केशवं राम नारायणम् ।
कृष्णदामोदरं वासुदेवं भजे ।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभम् ।
जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥
॥मंगलमुर्ती मोरया॥
॥गणपतिबाप्पा मोरया॥

१३ मनोबोधाची आरती

वेदांचें जें गुह्य शास्त्रांचें जें सार ।
प्राकृत शब्दांमाजी केला विस्तार ।
कर्म उपासना ज्ञान गंभीर ।
ज्याच्या मननमात्रें आत्मा गोचर ॥
जय देव जय देव जय मनोबोधा ।
पंचप्राणें आरति तुज स्वात्मशुद्धा ॥
जय देव जय देव ॥
दोन शतें पांच श्लोक हे जाण ।
श्रवणें अर्थें साधक पावति हे खूण ॥
परमार्थासी सुलभ मार्ग हा पूर्ण ।
यशवंत सद्गुरु दासाचा प्राण ॥
जय देव जय देव ॥

१४ आरती

नाना परिमळ दूर्वा शेंदुर शमिपत्रें ।
लाडू मोदक अन्नें परिपूरित पात्रें ॥
ऐसें पूजन केल्या बेएजाक्षर मंत्रें ।
अष्टहि सिद्धि नवनिधि देसी क्षणमात्रें ॥१॥
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ॥
तूझे गुण वर्णाया मज कैंची स्फूर्ती ॥धृ॥
तुझें ध्यान निरंतर जे कोणी करिती ।
त्यांची सकलहि पापें विघ्नेंही हरति ॥
वाजी वारण शिबिका सेवक सुत युवती ।
सर्वहि पावुनि अंतीं भवसागर तरती ॥जय देव ॥२॥
शरणागत सर्वस्वें भजती तव चरणीं ।
कीर्ति तयांची राहे जोंवरि शशि-तरणी ॥
त्रैलोक्यीं ते विजयी अद्भुत हे करणी ।
गोसावीनंदन रत नामस्मरणीं ॥जय देव॥३॥

१५ श्रीगीतेची आरती

जय देवी जय देवी जय भगवद्गीते ।
आरती ओवाळूं तुज वेदमाते ॥धृ॥
सुखकरणी दुखहरणी जननी वेदांची ।
अगाध महिमा तुझा नेणे विरंची ॥
ते तूं ब्रह्मी होतिस लीन ठायींची ।
अर्जुनाचें भावें प्रकट मुखींची ॥जय ॥१॥
सात शतें श्लोक व्यासोक्तीसार ।
अष्टादश अध्याय इतुका विस्तार ॥
अर्ध पाद करितां उच्चार ।
स्मरणमात्रें त्यांच्या निरसे संसार ॥जय ॥२॥
काय तुझा पार नेणें मी दीन ।
अनन्यभावें तुजला आलों मी शरण ॥
सनाथ करीं माये कृपा करून ।
बापरखुमादेवीवरदासमान ॥जय ॥३॥

१६ श्री सत्यनारायणाची आरती

जय जय दीनदयाळ सत्यनारायण देवा ।
पंचारति ओवाळूं श्रीपति तुज भक्तिभावा ॥ धृ॥
विधियुक्त पूजुनी करिती पुराण श्रवण ।
परिमळद्रव्यांसहित पुष्पमाळा अर्पून ॥
घृतयुक्त शर्करामिश्रित गोधूमचूर्ण ।
प्रसाद भक्षण करितां प्रसन्न तूं नारायण ॥ जय ॥ १॥
शतानंद विप्रें पूर्वी व्रत हें आचरिलें ।
दरिद्र दवडुनि अंतीं त्यातें मोक्षपदा नेलें ॥
त्यापासुनि हें व्रत या कलियुगिं सकळां श्रुत झालें ।
भावार्थें पूजितां सर्वां इच्छित लाधलें ॥ जय ॥ २॥
साधुवैश्यें संततिसाठीं तुजला प्रार्थियलें ।
इच्छित पुरतां मदांध होऊनि व्रत न आचरिलें ॥
त्या पापानें संकटिं पडुनी दुःखहि भोगिलें ।
स्मृति होऊनि आचरितां व्रत त्या तुवांचि उद्धरिलें ॥ जय ॥ ३॥
प्रसाद विसरुनि पतिभेटीला कलावती गेली ।
क्षोभ तुझा होतांचि तयाची नौका बुडाली ॥
अंगध्वजरायाची यापरि दुःखस्थिति आली ।
मृतवार्ता शतपुत्रांची सत्वर कर्णी परिसली ॥ जय ॥ ४॥
पुनरपि पूजुनि प्रसाद ग्रहण करितां तत्क्षणीं ।
पतिची नौका तरली देखे कलावती नयनीं ॥
अंगध्वजरायासी पुत्र भेटति येऊनि ।
ऐसा भक्तां संकटिं पावसि तूं चक्रपाणी ॥ जय ॥ ५॥
अनन्यभावें पूजुनि हें व्रत जे जन आचरति ।
इच्छित पुरविसी त्यांतें देउनि संतति संपत्ती ॥
संहरती भवदुरितें सर्वहि बन्धनें तुटती ।
राजा रंका समान मानुनि पावसी श्रीपती ॥ जय ॥ ६॥
ऐसा तव व्रतमहिमा अपार वर्णूं मी कैसा ।
भक्तिपुरस्सर आचरती त्यां पावसि जगदीशा ॥
भक्तांचा कनवाळू कल्पद्रुम तूं सर्वेशा ।
मोरेश्वरसुत वासुदेव तुज विनवी भवनाशा ॥ जय ॥ ७॥

१७ पसायदान

आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥
जे खळांचि व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो ।
भूता परस्परे पडो । मैत्र जीवांचे ॥
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥
वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूता ॥
चला कल्पतरुंचे अरव । चेतना चिंतामणीचे गाव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होउनि तिहीं लोकी ।
भजीजो आदिपुरुखी । अखंडित ॥
येथ म्हणे श्रीविश्वेश्वरावो । हा होईल दान पसावो ।
येणे वरे ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥
The pasaayadaana is by Sant Dnyaneshwar

१८ गणपति श्लोक

ॐ गणानां त्वा गणपतिं हवामहे ।
कविं कविनां उपमश्रवस्तमम् ।
ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आनः ।
शृण्वन् ऊतिभिः सीदसादनम् ॥

१९ मंत्र पुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः ॥
ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने ।
नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।
स मे कामान् काम कामाय मह्यं ।
कामेश्वरो वैश्रवणो ददातु कुबेराय वैश्रवणाय ।
महाराजाय नमः ।
ॐ स्वस्ति । साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं
वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं महाराज्यमाधिपत्यमयं
समंतपर्यायीस्यात् सार्वभौमः सार्वायुष आं
तादापरार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकेराळिति ।
तदप्येषः श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो
मरुतस्यावसन् गृहे ।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ॥
एकदंतायविद्महे वक्रतुण्डाय धीमहि ।
तन्नोदंती प्रचोदयात् ।
॥ मंत्रपुष्पांजली समर्पयामि॥
॥ गणपतिबाप्पा मोरया ॥

Please send corrections to Sunder Hattangadi (sunderh@hotmail.com)

Last updated on December 27, 1997